**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९२ वा ● शनिवार ०२ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 192 | Date : 02/12/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4


## राज्य शासन भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी : मुख्यमंत्री



नागपूर : राज्य शासन भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे आहे. विदर्भासह राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानाचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून शासनाला अहवाल प्राप्त होताच तातडीने शेतकऱ्यांना मदत करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली.

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी ही माहिती दिली. अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे राज्याच्या विविध भागात झालेल्या नुकसानाचे पंचनामे करण्यासंदर्भात नुकत्याच पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली.। पान २ वर

# महायुतीतल्या बारामती, सातारा, रायगड, शिरूरच्या जागा अजित पवार गट लढवणार

रायगड : लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. महायुतीत लोकसभेच्या चार जागा अजित पवार गट लढवणार असल्याचे आज अजित पवारांनी जाहीर केले आहे. बारामती, शिरूर, सातारा, रायगड या जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस निवडणूक लढवणारच आहे, असे अजित पवार यांनी जाहीर केले आहे. सध्या राष्ट्रवादीकडे लोकसभेच्या चार जागा आहेत. बारामती, सातारा, रायगड, शिरूर या चार जागा आहेत

अजित पवार म्हणाले, मार्चच्या पहिल्या आठवड्यात लोकसभेची आचारसंहिता लागण्याचा अंदाज आहे. लोकसभेच्या निवडणुकीत एनडीएचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनाच आणण्यासाठी आपल्याला प्रयत्न करायचा आहे. महाराष्ट्रातून ४८ खासदार निवडून आणायचे आहेतबारामती, शिरूर, सातारा, रायगड या जागा आपण निवडणार आहोत. इतर जागांसंदर्भात आपण



शिंदे, फडणवीसांशी चर्चा करून लवकरच निर्णय जाहीर करू. जागावाटपासंदर्भात या सगळ्यांशी प्राथमिक चर्चा झाली आहे. आपल्या कार्यकर्त्यांची ताकद पाहून आपण त्यांची निवड करणार आहोत

अजित पवार म्हणाले, काही जण आमच्यावर आरोप करतात की यांच्यावर केसेस होत्या म्हणून हे तिकडे गेले . मी कॅबिनेटमध्ये त्या खात्याचा मंत्री होतो म्हणून मला टार्गेट केलं गेलं पण ते आरोप सिद्ध झाले नाही. मंत्री आणि विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी ते आदेश दिले होते. राज्यात ते सातत्याने भारनियमन २०१२ रोजी होत होतं ते आम्ही बंद केलं. आज माझ्याकडे अर्थ खातं आहे. सहा लाख कोटींचं बजेट आहे.

माझ्यावर जे आरोप झाले जलसंपदा विभागाची त्यानंतर त्याचा विकास रेंगळाला. मी कामाला मान्यता देतो म्हणुन मला टार्गेट करण्यात आलं. त्यावेळी नेमलेल्या समितीचा अहवाल आला आणि त्यांनी मला क्लीन चीट दिली. ३२ वर्ष मी काम करतोय मला विचारलं जातं माझ्यावरच आरोप का होतात. परंतु मी कमीटमेंट पाळणारा नेता आहे. माझ्याकडे जीएसटी विभाग देखील होता. । पान २ वर

## वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी करावे : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



नागपूर : माफक दरातील सुलभ वैद्यकीय उपचार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असून कोविडसारख्या महामारीने मजबूत आरोग्य यंत्रणेची गरज अधोरेखित केली आहे. या पार्श्र्वभूमीवर वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य सेवा क्षेत्रात देशाला अग्रणी बनविण्यासाठी निर्धाराने प्रयत्न करुन जागतिकस्तरावर नाविन्यपूर्णतेचे केंद्र म्हणून देशाची ओळख प्रस्थापित करावी, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल) अमृत महोत्सवाचे उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास राज्यपाल रमेश बैस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये उपस्थित होते.

नव्या आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रात नवे परिवर्तन घडविण्याची गरज प्रतिपादित करुन राष्ट्रपती म्हणाल्या की, वैश्र्विक स्तरावर सर्वांना उत्तम आरोग्य सुविधा देण्याचे ध्येय साध्य करण्यात डॉक्टरांची अपुरी संख्या हे एक महत्वाचे कारण आहे. त्यामुळे वैद्यकीय सुविधांचा लाभ प्राप्त होण्यात असमानता निर्माण झाली आहे. ती दूर व्हावी यासाठी केंद्र सरकारकडून जिल्हा रुग्णालय संलग्नित वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्यास मदत केली जात आहे. यामुळे प्रादेशिक असमतोल आणि शहरी-ग्रामीण दरी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच आरोग्य सेवांच्या विकासासोबतच त्या परवडणाऱ्या असाव्यात, या उद्देशाने जगात सर्वात मोठी असणारी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्यात येत आहे. आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून आरोग्य विषयक दस्तावेजांचे डिजिटायझेशन करण्याचे सरकारचे प्रयत्न प्रशंसनीय आहेत. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण होत असल्याचे त्यांनी सांगितले.। पान २ वर

## रुग्ण सेवेच्या यज्ञ कुंडातून लाखोंचे प्राण वाचतील : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे भूमिपूजन**



नागपूर : गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय निदान उपलब्ध होत असल्यामुळे आजारांचे निदान अचूक होणार आहे त्यामुळे गरीब रुग्णांचे प्राण वाचविणे शक्य होईल. सेवाभावीवृत्तीने सुरू होणारा रुग्ण सेवेचा हा यज्ञकुंड अव्याहतपणे सुरू राहील, असा विश्र्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला. सिध्दीविनायक सेवा फाऊंडेशनच्यावतीने वर्धा मार्गावरील पावनभूमी येथे गंगाधरराव फडणवीस मेमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार कृपाल तुमाने, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, मोहन मते, ड. आशिष जायस्वाल, श्री.सिद्धिविनायक सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप जोशी, अमोल काळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, सामान्य माणसाला न्याय देण्याचे । पान २ वर

## एअर मार्शल मकरंद रानडे निरीक्षण आणि सुरक्षा विभागाचे नवे महासंचालक



नवी दिल्ली : भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल मकरंद रानडे यांनी १ डिसेंबर २०२३ रोजी नवी दिल्ली येथील हवाई दल मुख्यालयात निरीक्षण आणि सुरक्षा विभागाचे महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला. एअर मार्शल श्री.रानडे यांनी ६ डिसेंबर १९८६ रोजी भारतीय हवाई दलात लढाऊ विभागातून शासकीय सेवेला सुरुवात केली. त्यांनी ३६ वर्षांहून अधिक कालावधीच्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर यशस्वीरित्या काम केले आहे. लढाऊ विमानांच्या तुकडीचे आणि दोन हवाई स्थानकांचे कमांड म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. रणनीती आणि हवाई लढा प्रशिक्षण विकास संस्था आणि संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालय या संस्थांमध्ये संचालक म्हणून त्यांची कारकीर्द राहिली आहे. काबूल आणि अफगाणिस्तानच्या भारतीय दूतावासांमध्ये त्यांनी एअर अट्टेचे म्हणून कर्तव्य निभावले आहे.हवाई दलाच्या मुख्यालयात त्यांनी संचालक, कार्मिक अधिकारी, हवाई दल कर्मचारी निरीक्षण संचालनालयाचे मुख्य संचालक आणि हवाई दल कार्यकारी (अवकाश) विभागाचे सहाय्यक प्रमुख या पदांवर कार्यरत राहिले आहे. या नियुक्तीपूर्वी ते नवी दिल्ली येथील पश्रि्चम एअर कमांडच्या मुख्यालयात वरिष्ठ कर्मचारी अधिकारी पदावर कार्यरत होते. एअर मार्शल श्री. रानडे यांना वर्ष २००६ मध्ये वायु सेना (शौर्य) पदक आणि वर्ष २०२० मध्ये अतिविशिष्ट सेवा पदक देऊन गौरवण्यात आले होते. एअर मार्शल संजीव कपूर यांचा हवाई दल सेवाकार्याचा कार्यकाळ ३० नोव्हेंबर २०२३ रोजी पूर्ण झाल्यानंतर एअर मार्शल श्री. रानडे यांनी त्यांच्याकडून महासंचालकपदाचा पदभार स्वीकारला आहे.

## कार्तिकी यात्रेत मंदिर समितीस ४.७७ कोटीचे दान

**गतवर्षीपेक्षा १.५६ कोटीची वाढ; सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची माहिती**

पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिकी यात्रा दरवर्षी कार्तिक शुध्द एकादशी या दिवशी भरते. सन २०२३ यावर्षी कार्तिकी यात्रा गुरूवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी होती. या दिवशी मा.उपमुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस व सौ.अमृता फडणवीस तसेच मानाचे वारकरी श्री.बबन विठोबा घुगे व सौ.वत्सला बबन घुगे यांच्या शुभहस्ते श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेची शासकीय महापूजा संपन्न झाली. या यात्रेचा कालावधी दि.१४/११/२०२३ ते दि.२७/११/२०२३ असा होता.

या यात्रेत मंदिर समितीस विविध माध्यमांतून रू.४,७७,०८,२६८/- इतकी देणगी प्राप्त झाली आहे. त्यामध्ये श्रींच्या चरणावर रू.४०,१५,६६७/-, देणगी स्वरूपात रू.१,३०,०५,४८६/-, लाडूप्रसादातून रू.६२,४९,०००/-, भक्तनिवासातून रू.६६,६२,३७७/-, सोने-चांदी भेट वस्तूमधून रू.८,३६,२५४/-, परिवार देवता व हुंडीपेटीतून रू.१,५७,२१,५२७/-, मोबाईल लॉकर व इतर जमेमधून रू.१०,९४,८०७/- इत्यादीचा समावेश आहे. गतवर्षीच्या कार्तिकी यात्रेपेक्षा रू.१,५६,४८,५२६/- इतकी उत्पन्नात वाढ झाली आहे. याशिवाय, सुमारे ३ लाख ४० हजार ४७८ एवढ्या भाविकांनी



श्रींचे पदस्पर्श दर्शन व ५ लाख ७१ हजार २२० एवढ्या भाविकांनी श्रींचे मुखदर्शन घेतले असल्याची माहिती सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी श्री.राजेंद्र शेळके यांनी दिली.




दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### मराठा मंडळाची गरज..

मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले, खरा वीरवैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा. महाराष्ट्रातील सगळ्या मराठीजनांचा ऊर अभिमानाने भरून येईल, अशा या चैतन्यपंक्ती थोर विचारवंत आणि समाजसुधारक सेनापती बापट यांनी लिहून ठेवल्या आहेत. पण आजची महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली तर मराठी माणसे आरक्षणाचा विषय घेऊन एकमेकांविरोधात आक्रमक झालेली दिसत आहेत. त्यातून काही ठिकाणी हिंसाचार पेटला. त्यात आता मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी असे विविध समाजगट आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झालेले दिसत आहेत. ही आक्रमकता आणि एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोप अधिक प्रखर होत चालले आहेत. आरक्षणावरून नेते एकमेकांविषयी बोलताना एकेरीवर येत आहेत. राज्यातील सगळ्या मराठी लोकांनी एकत्र येऊन काही वर्षे लढा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती केली. महाराष्ट्र हा शब्द तेव्हाच उदयाला आला. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सगळ्या मराठी माणसांनी एकत्र येऊन आपला विकास आणि उत्कर्ष साधावा यासाठी विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या. इतकेच नव्हे तर सगळ्या मराठी भाषिकांनी साहित्यिक आणि सांस्कृतिक विकास साधावा यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. आरक्षणातून आपला विकास साधला जाईल, असे आता प्रत्येकाला वाटत आहे. त्यामुळे त्यांना मिळाले तर माझ्या जातीलाही आरक्षण मिळाले पाहिजे, ही भावना उसळून उठत आहे. त्यातूनच मग मराठे म्हणतात आम्हाला ओबीसी म्हणून आरक्षण द्या. ओबीसी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून तुम्ही आमची गैरसोय कशाला करता? धनगर समाज म्हणतो, आम्हाला आदिवासी म्हणून आरक्षण द्या. तर आदिवासी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून आमची गैरसोय करू नका. असे सगळे समाजगट जातीच्या नावावर वेगळे होऊन आक्रमक झालेले आहेत. त्यातून मार्ग कसा काढायचा, याचे राज्य सरकारसमोर आव्हान उभे राहिलेले आहे. ज्यावेळी भविष्याकडे पाहिल्यावर दिशा दिसत नाही, तेव्हा भूतकाळातील एखादा आदर्श आपल्याला मार्गदर्शन करू शकतो. जेव्हा मराठा सरदार आपापसात लढू लागले तेव्हा पहिले बाजीराव पेशवे यांनी मराठा मंडळाची स्थापना केली. मराठा सरदारांनी एकमेकांविरोधात लढू नये, असा करार केला. आज महाराष्ट्रात मराठीजनांची आरक्षणावरून आपापसात सुरू असलेली लढाई पाहता पुन्हा अशाच मराठा मंडळाची गरज आहे, असे वाटते.

## साथीचे आजार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी गरजेची

राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासह डोळ्यांच्या साथीने राज्यातील नागरिक हैराण झाले आहे. मागील पंधरा दिवसात डोळ्यांची साथ राज्यभर झपाट्याने पसरत आहे. आज अखेर राज्यात डोळ्यांच्या साथीची लागण झालेले अडीच लाखांच्या वर रुग्ण आहेत विशेष म्हणजे यात शाळकरी विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. ही साथ वेळीच आटोक्यात न आल्याने झपाट्याने वाढत आहे. डोळे येणे या आजारावर गुणकारी असलेले आय ड्रॉपचा सध्या राज्यभर तुटवडा जाणवत आहे त्यामुळे चिंतेच भर पडली आहे. केवळ डोळे येणे हीच आरोग्य खात्याची एकमेव डोकेदुखी नाही तर त्यासोबत डेंग्यू, मलेरिया



आणि चिकणगुणियाचे रुग्णही मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः विदर्भात डेंग्यूने हाहाकार उडवला आहे. नागपूरसह संपूर्ण विदर्भात डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे. मुंबईतही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डोळे येणे, डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. तीन वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर - संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही. या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल. प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते. नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

पान १ वरुन

### राज्य शासन भक्कमपणे ..

या बैठकीत नुकसानाचे पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले. त्यानुसार राज्यात नुकसानाचे पंचनामे युद्ध पातळीवर सुरू आहेत.

२ हेक्टर ते ३ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानाचे पंचनामे करण्यासंदर्भात मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. राज्यभरातून पिकांच्या प्राप्त नुकसानींचे अहवाल एकत्र आल्यानंतर शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.खासदार कृपाल तुमाने, आमदार ड. आशिष जयस्वाल यावेळी उपस्थित होते. तत्पूर्वी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी आदींनी मुख्यमंत्री शिंदे यांचे विमानतळावर स्वागत केले.

### वैद्यकीय संशोधन आणि आरोग्य

अवयवदानाबाबत समाजात पुरेशी जागरुकता नसल्याने गरजू रुग्णांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. मात्र, त्यासोबतच अवैधरित्या अवयव विक्रीचे प्रकारही घडत असल्याबाबत खंत व्यक्त करुन वैद्यकीय क्षेत्राने अवयवदानासाठी जनजागृती करावी तसेच मानसिक आरोग्याच्या समस्येचाही सहानूभूतीने विचार करावा असे आवाहन राष्ट्रपतींनी केले.

मध्य भारतात गेल्या ७५ वर्षांपासून वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि आरोग्य सेवा प्रदान करण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची त्यांनी विशेष प्रशंसा केली. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणाऱ्या वैद्यकांची मोठी फळी निर्माण केल्याचे गौरवोद्गार राष्ट्रपतींनी काढले.

वैद्यकीय महाविद्यालयाच्या नुतनीकरणासाठी शासनाने भरीव निधी दिल्याबद्दल समाधान व्यक्त करुन श्री. गडकरी म्हणाले की, नव्या सुविधांनी सुसज्ज होणारे हे रुग्णालय व महाविद्यालय वाढती गरज भागवू शकणार आहे. या महाविद्यालयाने नागपूरसह लगतच्या राज्यातही उल्लेखनीय वैद्यकीय सेवा दिली असून विशेषत: कोविडकाळातील योगदान प्रशंसनीय आहे. पूर्व विदर्भात सिकलसेल, थॅलेसेमियाचे रुग्ण लक्षणीय संख्येने आढळून येतात. अमृत महोत्सवाचे औचित्य साधत लवकरच बोन मॅरो विषयक उपचार सुविधेची सुरुवात होणार आहे.

स्थापनेवेळी आशियातील सर्वात मोठे वैद्यकीय महाविद्यालय अशी ओळख असणाऱ्या या संस्थेने प्रारंभापासूनच सेवाभाव जपत असंख्य रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. ही देशातील एक महत्वाची वैद्यकीय संस्था असून अनेक विख्यात तज्ज्ञ या संस्थेने दिल्याचा विशेष उल्लेख करुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाविद्यालयाच्या सुविधांमध्ये काळानुरूप बदलाची गरज होती. यासाठी अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाविद्यालयाला नवे स्वरूप देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी शासनाकडून ५५० कोटींचा निधी देण्यात आला असून लवकरच कायापालट होणार आहे. एक अत्याधुनिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणून त्यास नवे रुप मिळणार आहे. त्याअंतर्गत शस्त्रक्रिया कक्ष, अद्ययावत यंत्र सामग्री, वसतिगृह, नवीन इमारती, क्रीडांगण, कॅन्सर इन्स्टिट्यूट आदींची उपलब्धतता होणार असून पुढील ५० वर्षांची गरज या निमित्ताने पूर्ण होणार आहे. सर्वसामान्यांना दर्जेदार वैद्यकीय सुविधा मिळाव्यात हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यात या संस्थेचे योगदान मोलाचे ठरणार आहे. आयजीएमसीसाठीही ४०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

दर्जेदार आरोग्य सुविधांसाठी राज्यात दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालयांची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती देऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले की, निवासी वैद्यकीय अधिका-यांची १ हजार ४३२ पदांची पदभरती होणार आहे. या माध्यमातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यासोबतच नवीन प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयांसाठी आशियाई विकास बँकेमार्फत चार हजार कोटी रुपयांचा निधी मिळणार आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बी.एसस्सी नर्सिंग आभ्यासक्रम सुरू करण्यात येईल. नर्सिंग, तांत्रिक, अतांत्रिक संवर्गातील ५ हजार १८२ पदांची भरती प्रकिया पूर्ण झाली असून लवकरच नियुक्तीपत्र देण्यात येणार असल्याचे मंत्री श्री. मुश्रीफ यावेळी म्हणाले.

तत्पूर्वी, महाविद्यालयांशी संबधित चार मान्यवरांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयातून उत्तीर्ण पहिल्या तुकडीचे विद्यार्थी डॉ. बी. जे. सुभेदार, महाविद्यालयासाठी जमीन दान करणारे कर्नल डॅा. कुकडे यांचे नातू ड. दिनकर कुकडे आणि या महाविद्यालयाला मदत करणाऱ्या डॉ. शकुंतला गोखले यांचे नातेवाईक रवी लिमये व डॉ. प्रमोद गिरी यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवनिर्मित सभागृहाचे डिजिटल पद्धतीने उद्घाटनही करण्यात आले. विशेष डाक तिकिटाचे अनावरण करण्यात आले. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते स्मरणिका आणि कॉफी टेबल बुकचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॅा. राज गजभिये यांनी केले.

### महायुतीतल्या बारामती, सातारा,

माझ्यावर आजपर्यंत कुठल्याही डीपीसीसंदर्भात आरोप नाही. काम व्हावी हीच कार्यकर्त्यांची अपेक्षा असते. विकासकामांच्या बाबतीत पहिलं प्राधान्य राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना, दुसरं खासदारांना तर तिसरं राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांना असणार आहे. युवती संघतेनेत काही वाद आहेत ते अदिती तटकरेने ते वाद मिटवावेत त्यामुळं युवती विभागाची जबाबदारी घे. जास्तीत जास्त महिलांचे प्रश्न सोडवायला संधी मिळेल, असे देखील अजित पवार म्हणाले.

सध्या असलेल्या पालकमंत्र्यांशिवाय उरलेल्या मंत्र्यांनाही पालकमंत्रीपद मिळावं यासाठी चर्चा करून लवकरत लवकर निर्णय घेणार आहे. आम्ही राहिलेल्या मंत्र्याबाबत देखील पालकमंत्री पद देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. इतर नेत्यांसोबत लवकरच या विषयांवर बसणार आहे.

अनेक वर्ष संघटनेत काम करत आहोत. २००४ साली जे घडलं होतं ते मला काल कळलं. आधीच्या जनसंघाबाबत बोलल जातं होतं की जातीयवादी पक्ष आहे त्यामुळं आपण भाजप शिवसेनेपासून लांब राहत होतो. आता काळ बदलला आहे. अटलबिहारी वाजपेयी प्रधानमंत्री झाले. आपण आपली विचारधारा सोडलेली नाही. मी मुस्लिम समाजाला सांगू इच्छितो. आपण भाजप एकनाथ शिंदे यांच्यासोबत आहोत परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी जो विचार सांगितला त्याचं मार्गावर चाललो आहे.

१० जून १९९९ पवार साहेबांनी या पक्षाची घोषणा केली तेव्हा त्याचा सगळ्यात जास्त समर्थन, पुढाकार महाराष्ट्रातून होता. मी जरी संघटनेचा पदाधिकारी त्या काळात नसलो तरी संघटनेचं काम कोण करत होतं हे सगळ्यांना माहिती आहे. राज्यात पक्षाच्या इमारती उभारण्याचं काम आम्ही केलं. २०१९ मधे प्रकाश साळुंखेंना मंत्री व्हायचं होतं, ते नाराज होते. प्रकाश साळुंखे राजीनामा देण्याच्या तयारीत होते. त्यांना मी, जयंत पाटील यांना खूप समजावलं, त्यांनी कार्याध्यक्षपदाचा राजीनामा दिला. त्यावेळी जयंत पाटील म्हणाले मी एक वर्ष अध्यक्ष राहतो, काम करतो मग तुम्हाला जबाबदारी देऊत्यानंतर मी जयंत पाटलांना आठवण करून दिली. मात्र जयंत पाटील पुढे ढकलत राहिले..मंत्रीपद ठेवा आणि अध्यक्षपद यांना द्या. मी म्हणतो एकदा शब्द दिला की तो पाळा ना..कुणाला नाराज करू नका, संघटनेसाठी केलेल्या या बारिक बारिक गोष्टी साठत राहतात आणि मग त्यांचा अशा पद्धतीने उद्रेक होतो.

महिनाभरात तुम्ही सगळ्या गावपातळीवरील पदाधिकारी नेमण्याची जबाबदारी तुम्हाला दिली आहे.एक महिन्यात तुम्हाला हे सगळं पूर्ण करायचं आहे. आपल्याला जास्तीचं काम करायचं आहे.आत्मचिंतन करा की आपण कुठे जातो आहे. फ्रंटलच्या कार्यकर्त्यांनी मुंबईच्या कार्यालयात बसण्यापेक्षा आपापल्या ठिकाणी राहा. मी आता आठवड्यातील तीन दिवस मुंबईत राहील, एक दिवस पुण्यात राहणार आहे. पुण्याचे साडे तीन खासदार..(बारामती, शिरूर, पुणे) पक्षांतर्गत लॉबिंग अजिबात खपवून घेतलं जाणार नाही. किमान समान कार्यक्रम पाळून आपण सत्तेत सहभागी झालो आहोत. आपला मूळ पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहोत. कोर्ट कचेऱ्यांमध्ये तुम्ही लक्ष देऊ नका…लक्ष देणारे लक्ष देतील.

काही गोष्टी आपल्याला पटत नसल्या तरी पटवून घ्याव्या लागतात. २० वर्षांनी जेव्हा आपण १६० कोटीचा देश होऊ तेव्हा जगातला सगळ्यात ज्येष्ठांचा देश भारत होईल. एक किंवा दोन अपत्यांवर आपण थांबलं पाहिजे यासाठी मोदी साहेबांनी काय कायदा करावा तो करावा. कुटुंब नियोजन केले पाहिजे. दोन्ही मुली झाल्या तरी चालेल वंशाचा दिवा मुलगाच असतो असं काही नसते मुलीच सगळ करतात. पण काहींनाच असं वाटत. समान नागरी कायदा म्हणजे प्रत्येकसाठी एकच कायदा…तुमच्या आरक्षणाला कुणीही धक्का लावणार नाही

### रुग्ण सेवेच्या यज्ञ कुंडातून लाखोंचे

निर्णय घेताना आरोग्य सेवेला प्राधान्य दिले आहे. राज्यातील गरीब व गरजू रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यासाठी जिल्हास्तरावर वैद्यकीय महाविदयालय सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. रुग्णांची संख्या व प्रतिक्षा यादी लक्षात घेता सेवाभावी संस्थांनी पुढे येवून आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी सहकार्य करावे. बदलती जीवनशैली तसेच वातावरणातील बदलामुळे आजारांचे प्रमाण वाढत आहे. कर्करोगाच्या रुग्णांच्या निदानासाठी अत्याधुनिक रुग्णालयांची आवश्यकता आहे. गंगाधरराव फडणवीस डायग्नोस्टिक सेंटरमुळे या कामास प्रोत्साहन मिळेल, असे त्यांनी सांगितले.

राजकारणाला समाजकारणाची जोड असणे आवश्यक आहे. फडणवीस कुटुंबाने सर्वसामान्य जनतेचे जीवन सुसहाय्य व्हावे यासाठी सातत्याने काम केले आहे.सेवाभावी संस्थांनी उच्च दर्जाच्या तसेच सर्व सामान्यांना परवडणाऱ्या आरोग्य सुविधा उपलब्ध

करून दिल्यास शासनातर्फे संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राजकारणासोबत शिक्षण ,आरोग्य व विकासाच्या क्षेत्रात काम करण्याची आवश्यकता व्यक्त करतांना केंद्रीय मंत्री श्री. गडकरी म्हणाले की, प्राण वाचविणाऱ्या आरोग्य सेवा गरिबांपर्यंत पोचविण्यासाठी गंगाधरराव फडणवीस डायग्नोस्टिक सेंटर महत्त्वाची भूमिका बजावेल. विदर्भातील जनतेपर्यंत या सेंटरच्या माध्यमातून उत्तम आरोग्य सेवा पोहोचणार आहेत. गंगाधर फडणवीस यांनी प्रतिकूल परिस्थितीत समाजसेवेला प्राधान्य दिल्याचे श्री.गडकरी यांनी सांगितले.

अन्न ,वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांसोबत बदलत्या काळानुसार शिक्षण,आरोग्य आणि रोजगार हे महत्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. सामान्य जनतेला परवडणाऱ्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन तत्पर आहे, त्यासोबतच खाजगी व सेवाभावी संस्थांनी पुढे येण्याची आवश्यकता व्यक्त करताना श्री. फडणवीस म्हणाले, सर्वसामान्यांना आरोग्यावर खर्च करावा लागतो.

हा खर्च टाळणे शक्य आहे.अशा संस्थांच्या मागे समाजानेही उभे राहण्याची आवश्यकता आहे. गरीब रुग्णांना नि:शुल्क सेवा उपलब्ध व्हावी, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री यांनी व्यक्त केली. प्रांरभी, संदीप जोशी यांनी प्रास्ताविकात गंगाधरराव फडणवीस डायग्नोस्टिक सेंटर येत्या सहा महिन्यात पूर्ण करुन या सेंटरचे लोकार्पण करण्यात येईल.

तसेच अत्यंत उच्च तंत्रज्ञानाने सुसज्ज उपचारपध्दती येथे उपलब्ध होतील, असे सांगितले. स्वागत ड. अक्षय नाईक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन रेणुका देशकर यांनी केले, तर संस्थेचे सचिव पराग सराफ यांनी आभार मानले.

## जागतिक कौशल्य स्पर्धा सन २०२४ मध्ये सहभागी होण्याचे आवाहन




सोलापूर/प्रतिनिधी: जागतिक कौशल्य स्पर्धा ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्ठता स्पर्धा आहे. दर दोन वर्षानी आयोजित होणारी ही स्पर्धा ‘ जागतिक कौशल्य स्पर्धा-२०२४ यावेळी फ्रांस (ल्योन) येथे आयोजित करण्यात आहे. या स्पर्धेमध्ये भारतातील प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने सोलापूर जिल्हयातील युवक-युवतींनी विविध क्षेत्रामध्ये होणाऱ्या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभाग सहायक आयुक्त, हणमंत नलावडे यांनी केले आहे.

ही स्पर्धा जिल्हा, विभाग, राज्य आणि देशस्तरावर स्पर्धा घेतली जाणार असून याद्वारे गुणवान कौशल्यधारक पात्र स्पर्धक निवडले जाणार आहेत. जगभरातील २३ वर्षाखालील तरूणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलपिंक खेळासारखीच आहे. यापुर्वी ४६ जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये ६२ सेक्टर मधुन ५० देशातील १०००० उमेदवार समाविष्ट असून सदर स्पर्धा १५ देशात १२ आठवड्यासाठी आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी, २००२ किंवा तद्वंतरचा असावा. तसेच, आडेटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, क्लाऊड कंप्युटींग, सायबर सिक्युरिटी, डिजिटल कन्स्ट्रकशन, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नॉलॉजी, इंडस्ट्री ४.०, इन्फॉरमेशन नेटवर्क केबलिंग, मेकॅट्रॉनिक्स आणि रोबोट इंटिग्रेशन वॉटर टेक्नॉलॉजी या क्षेत्राकीता उमेदवाराचा जन्म दि. १ जानेवारी १९९९ किंवा त्यानंतरचा असणे अनिवार्य आहे.

फ्रान्स (ल्योन) येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२४ साठी जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेकरिता सर्व शासकीय आणि खाजगी औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई टूल रूम्स, सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविद्यालये, आयएचएम / हॉस्पिटेलिटी इंस्टिट्यूट, कॉर्पोरेट टेक्निकल इंस्टीट्यूट, स्किल ट्रेनिंग इंस्टीट्यूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबीव्हीटी, खाजगी कौशल्य विद्यापीठ, इंस्टीटच्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग, इतर सर्व प्रशिक्षण संस्था, कला, वाणिज्य, विज्ञान शाखेची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये, तसेच, महाराष्ट्र राज्य कौशल्य सोसायटीकडे अधिनस्त सर्व व्यवसायिक कौशल्य प्रशिक्षण संस्था, विविध व्यावसायिक आस्थापना आणि कारखाने यांचेकडील विहीत वयोमर्यादेतील इच्छूक प्रतिभासंपन्न व कुशल उमेदवारांचे नामांकन या स्पर्धेसाठी करता येईल.

तसेच या स्पर्धेत निवड झालेल्या उमेदवारांना वेळोवेळी लागणारे मार्गदर्शन व सहाय्य महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांचेकडून करण्यात येईल. यासाठी सहभाग घेण्यास इच्छुक असलेल्या पात्र उमेदवारांनी https://kaushalyamahaswayam.gov.in या लिंकवर भेट देऊन नोंदणी करून आपला सहभाग निश्र्चित करावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर कार्यालयाच्या दूरध्वनी क्र. ०२१७-२९५०९५६ वरती संपर्क साधावा असे आवाहन, सहायक आयुक्त श्री. नलावडे ,केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# एचआयव्ही/ एड्स बाधित रुग्णांना सर्वसामान्य माणसाप्रमाणे वागणूक मिळाली पाहिजे

## मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे




* जागतिक एड्स दिनानिमित्त भव्य जनजागरण रॅलीचे आयोजन
* जागतिक एड्स दिनानिमित्त मान्यवर व विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

सोलापूर/प्रतिनिधी : एचआयव्ही / एड्स बाधित रुग्णांना समाजामध्ये सर्वसामान्य माणसाप्रमाणे वागणूक दिली पाहिजे, पीडिताप्रती समाजाने भेदभाव करू नये. ह्या आजारावर योग्य औषध उपचार घेतल्यानंतर मात करता येते. बाधित रुग्णांनी आजार झाल्यानंतर घाबरून न जाता योग्य वैद्यकीय उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केले.

१ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. यानिमित्त आयोजी जनजागरण रॅलीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले, त्याप्रसंगी श्रीमती आव्हाळे बोलत होत्या. या रॅलीस सोलापूर शहर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ.सुधीर देशमुख, उप अधिष्ठता डॉ.जयकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने,

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस, नोडल ऑफीसर डॉ. विठ्ठल धडके, सुक्ष्मजीव शास्त्र विभागाचे डॉ. विजय चिंचोळकर आदी मान्यवर तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजामध्ये एचआयव्ही/एड्स आजराबाबत अनेक गैरसमज आहेत. याविषयी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. फक्त एक डिसेंबर रोजी जनजागृती न करता तळागाळातील लोकांपर्यंत जाऊन या आजाराविषयी लोकांचे नियमित प्रबोधन करणे आवश्यक असल्याचे मत पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी व्यक्त केले. यावर्षीच्या जागतिक एड्स दिनानिमित्तची थीम 'आता नेतृत्व आघाडी समुदायाची' ही असून जे लोक एचआयव्ही संसर्गित आहे त्यांना समाजात भेदभावाचा सामना करावा लागतो अशा परिस्थितीत पीडितासोबतचा भेदभाव संपवून त्यांना सन्मान देण्यावर यावर्षी भर देण्यात आला आहे, अशी माहिती अधिष्ठता डॉ. सुधीर देशमुख यांनी दिली. रॅलीचा मार्ग- प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, पोलीस आयुक्त राजेंद्र माने व अन्य मान्यवरांनी हवेत फुगे सोडून जनजागृतीपर रॅलीचा शुभारंभ केला. ही जनजागृती रॅली सिव्हील चौक मार्गे सिध्दार्थ सोसायटी, मौलाली चौक, जगदंब चौक, सात रस्ता, शर्मा स्वीट्स, भगतसिंग मार्केट गार्डन मार्गे येवून अश्रि्वनी हॉस्पीटल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. या जनजागृतीपर रॅलीसाठी सोलापूर शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी/ विद्यार्थिनी, एन. एस.एस. विभागातील विभाग प्रमुख व विद्यार्थी -विद्यार्थ्यांनी सहभागी झालेले होते.

रॅलीत सहभागी विविध संस्था-

१ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्र, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,सोलापूर व शासकीय महाविद्यालय,सोलापूर, एम.एम.पटेल चॅरीटेबल स्ट्रट संचलित अश्रि्वनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय हॉस्पीटल आणि संशोधन केंद्र कुंभारी, अश्रि्वनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र, फॅमिली असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर, लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त भव्य जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले.

यानिमित्त सर्व मान्यवरांनी व उपस्थित महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनींनी जागतिक एड्स दिनानिमित्त शपथ घेतली.

# किनी कदुत बसव सृष्टीतील संविधान पार्कचे उद्घाटन



लातूर/प्रतिनिधीः अहमदपूर तालुक्यातील किनी कदु येथे २७ नोव्हेंबर रोजी बसव सृष्टी परिसरातील संविधान पार्कचे उद्घाटन आ.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ नागरिक व्यंकटराव तुडमे यांनी रोपट्याला पाणी घालून व सरनाम्याचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी सकल लिंगायत समाजाचे महाराष्ट्र समन्वयक विजयकुमार हत्तुरे,सोलापूरचे उद्योगपती रेवणसिद्ध बिजर्गी,दलित मित्र नितीन शिवशरण,नांदेडचे बसवाचार्य प्रा.आनंद करने,चन्नम्मा ब्रिगेडच्या राज्याध्यक्ष शितल महाजन,बसव ब्रिगेडचे सिद्धेश्र्वर औरादे,लवराळे, धनराज गौंड,काशिनाथ इसादकर,लातूरचे बसव दर्शिका संपादक सुनील हिंगणे,चंद्रशेखर कत्ते,अँड सूरज विभुते,एम.के.कस्तुरे,योगेश स्वामी,निवृत्ती कांबळे, संजय पाटील,रवी बिराजदार पुण्याचे नरसिंग मुळे,राष्ट्रीय लिंगायत संघाचे संस्थापक प्रदीप वाले कोल्हापूर,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कोषाध्यक्ष मिलिंद साखरपे कोल्हापूर,किणीकदु चे सरपंच व्यंकटराव तुडमे,उपसरपंच सूर्यकांत कोकाटे,अहमदपूरचे राजकुमार मजगे,प्रा.गोविंद शेळके,हरिदास तम्मेवार उपस्थित होते.

यावेळी आ.बाबासाहेब पाटील म्हणाले,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाची निर्मीती करताना समाजाच्या सर्व घटकांना विचारात घेतले. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी समानता प्रस्थापित केली. किनी कदु येथे प्रा. भीमराव पाटील यांच्या संकल्पनेतून मोघा रोडवर मोघा धरणाच्या काठी निसर्ग रम्य परिसरात बसव सृष्टीचे निर्मिती केली जात आहे. महात्मा बसवेश्र्वरांचा ११ फुटी पुतळा,शांतिभवन गुहा, शरणभवन,वचनवन,वचन स्तंभ,अक्कमहादेवी पुतळा, शरणग्राम,वनराई,महाद्वार, पर्यटक निवास,दासोहभवन अनुभव मंटप,ग्रंथालय, म्युझियमची निर्मिती केली जाणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी ४०० वृक्षांचे संवर्धन करून ऑक्सिजन झोनची निर्मिती करण्यात आली आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.भीमराव पाटील,शिवदास पाटील, राजकुमार बिराजदार, रमाकांत पाटील,उमाकांत पाटील,विठ्ठलराव गुडमे,प्रा. व्यंकटेश पाटील,दत्ता गिरी, कोंडिबा हारगिले,राहूल सोनकांबळे,संजय पाटील, संग्राम पाटील,बालाजी विठ्ठल भुरे,शिवप्रसाद पाटील, मारोती हिप्पळगावे,परमेश्र्वर भुरे,विश्र्वंभर मटके,राहूल शेंबाळे,राजेश्र्वर भुरे,विलास भुरे,दिलीप सावरगावे, ज्ञानेश्र्वर तुडमे,विशाल कोकाटे,शिवाजी भुरे,भास्कर भुरे, राजेंद्र भुरे परिश्रम घेतले.

# उल्हासनगर महानगरपालिकाचे नागरिकांना जाहिर आवाहन



उल्हासनगर /बाळासाहेब अहिरे : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली (मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली) यांचे निर्देशानुसार शनिवार दिनांक ०९ डिसेंबर, २०२३ रोजी संपूर्ण भारतभर आयोजित होणार आहे.त्यानुषंगाने शनिवार दिनांक ०९ डिसेंबर, २०२३ रोजी तालुका न्यायालय उल्हासनगर येथे आयोजित लोकन्यायालयात पुढीलप्रमाणे प्रकरणांचा निपटारा करण्यात येणार आहे.

१) मालमत्ता करावरील विलंब शास्ती माफ करणे (शेवटची अभय योजना) २) मालमत्तांचे कर निर्धारण व आकारणी संदर्भात वाद असलेली प्रकरणे ३) दुबार नोंद व इतर कारणास्तव असलेल्या नोंदी रदद् करुन त्यावरील कर आकारणी निर्लेखित करणेबाबतची प्रकरणे

नागरिकांनी आपले मालमत्तेसंदर्भातील प्रकरण/तक्रारीबाबत आवश्यक त्या पुराव्यासह लेखी निवेदन दिनांक ०६/१२/२०२३ पर्यंत संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत महानगरपालिकेत सादर करणे आवश्यक आहे.त्यानुषंगाने शनिवार दिनांक ०९ डिसेंबर, २०२३ रोजी तालुका न्यायालय, उल्हासनगर येथे आयोजित लोकन्यायालयाबाबत उल्हासनगर मधिल नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे उल्हासनगर महानगरपालिका यांनी पत्रक काढून आवाहन केलं आहे

# देशाच्या प्रगतीत विकास पत्रकारितेचे योगदान मोठे : डॉ काकडे

## सोलापूर विद्यापीठात विकास पत्रकारितेवर राष्ट्रीय परिसंवाद संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर भारतीय पत्रकारितेचा इतिहास हा खूप मोठा असून येथील उत्तरपत्र व पत्रकारांची भूमिका ही नेहमीच देशाच्या विकासासाठी राहिली आहे समाज व देशाच्या प्रगतीसाठी विकास पत्रकारितेची अतिशय गरज असून आज पर्यंत विकास पत्रकारितेने मोठे योगदान दिले जे गौरव उद्गार विजापूर येथील कर्नाटक स्टेट युनिव्हर्सिटीचे माझे कुलगुरू प्रा डॉ ओंकार काकडे यांनी काढले

मंगळवारी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिक शास्त्रीय संकुल येथील मास कमुनिकेशन विभाग सोलापूर विज्ञान केंद्र आणि सुसंवाद माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान पर्यावरण आणि विकास पत्रिका रे तेथील नवे प्रवाह या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाचे उद्घाटन डॉ काकडे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पुरातत्त्वशास्त्र विभागाच्या प्रमुख माया पाटील या होत्या

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख निशा पवार मुंबई च्या एसएनडीटी विद्यापीठातील डेव्हलपमेंट कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख डॉ मीरा देसाई मध्य प्रदेशातील मखलाल चतुर्वेदी विद्यापीठाचे डॉ संदीप भट सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वृत्तविद्या विभागातील प्रा योगेश बोराटे जळगाव येथील ज्येष्ठ पत्रकार पंकज पाटील विज्ञान केंद्राचे संचालक राहुल दास सुसंवाद संघटनेचे सचिव सचिन गायकवाड यांची उपस्थिती होती.प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मास्क कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख रवींद्र चिंचोलकर यांनी केले यावेळी मान्यवराच्या हस्ते मास कमुनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ रवींद्र चिंचोलकर यांच्या सोशल मीडिया फॉर पार्टी सेपेंटरी डेव्हलपमेंट या ग्रंथाचे प्रकाशन झाले

पुढे बोलताना डॉ काकडे यांनी विज्ञान व तंत्रज्ञान यामुळे मोठे संशोधन होऊन विकास होत असल्याचे स्पष्ट केले विकास पत्रकारितेसाठी बाबी फार महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले डॉ माया पाटील यांनी डॉ चिंचोलकर यांनी मास कम्युनिकेशन विभागाच्या मोठा विकास केला व पर्यावरणाने विद्यापीठाचाही विकास झाले जी त्यांनी यावेळी सांगितले यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले

माध्यमाशी विकासात भूमिका या विषयावरील चर्चासत्रात ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी लोकमतचे कार्यकारी संपादक सचिन जवळकोटे तरुण भारतचे संपादक

विजयकुमार पिसे सकाळचे वरिष्ठ पत्रकार रजनी जोशी दिव्य मराठी वरिष्ठ पत्रकार सिद्धाराम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले सर्व जिल्ह्याच्या भूमिका बजावल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी कांबळे यांनी केले तर आभार अंबादास भास्के यांनी मांडले

# पंढरपूर नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार



पंढरपूर/प्रतिनिधीः कार्तिक यात्रा संपल्यानंतर पंढरपूर शहरातील विविध मालमत्ता धारकांना २७% मालमत्ताकरवाडीचे नोटीस घरोघरी दुकानांमध्ये नगरपालिकेने वाटप केली आहे तर काहींना शंभर टक्के वाढ करण्यात आली आहे सदर नोटीस मुळे पंढरपूर नगरपालिकेचा मनमानी कारभार चव्हाट्यावर आला आहे

सदर ओटीसी मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकदम दुप्पट रक्कम एवढी रक्कम आपण नवीन कर योग्य मोल निर्धारण निश्र्चित केलेली आहे हे मुळातच बेकायदेशीर असूनही रक्कम कोणत्या तरतुदी आणावे निश्र्चित केली गेली याबाबत कसलीही प्रकारच्या नोटिसांमध्ये खुलासा नाही याउलट महाड सरकार प्रतिवर्षी वेळेवर व मुद्दे कर मालमत्ता चालकांनी कर भरल्यास त्या रकमेमध्ये काही प्रमाणात ग्राहकांना सोड देत असते त्यामुळे असे अचानक कसल्याही प्रकारचा कर वाढवता येत नाही

. दरम्यान या नोटीसामध्ये पाणीपट्टीमध्ये तीस ते चाळीस टक्के वाढ करून चार वर्षे होत नाही तोपर्यंत घरपट्टी मध्ये ३० टक्के वाढ सुचवले आहे नगरपालिकेवर प्रशासन राज असल्याने अधिकारांचा मनमानी कारभार चालू आहे अशा मनमानी कारभारास साप लावणे विरोध करणे गरजेचे असताना शहरातील सत्ताधारी व विरोधी कोणतीही याबाबत आवाज उठवलेला अजून पर्यंत दिसला नाही तर याबाबत नागरिकांनी आपल्या हरकती नगरपालिकेच्या शिवसेना मात्र केल्या जात आहेत या संपूर्ण प्रकरणांमध्ये पंढरपूर नगरपालिकेतील प्रशासनाचा मन माझे कारभार व पंढरपूरकरांच्या समोर आला आहे तर यावर वेळीच आवाज उठवणे गरजेचे झाले आहे

याबाबत सर्व पक्ष संघटनांनी सर्वसामान्यांनी २१ डिसेंबर पर्यंत सदर दरवाढीस विरोध केला तरच ही करवार रोखता येऊ शकेल तरी सर्व जागरूक नागरिक राजकीय पक्ष व्यापारी संघटना सामाजिक संघटना यांनी आवाज उठवावा तर कर वाढ रद्द होऊ शकते प्रत्येक नागरिकांनी करवाडीच्या विरोधात १२ डिसेंबर पर्यंत दाखल करून पोच घ्यावी असे आव्हान नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे

# अवकाळी पावसाने नुकसानग्रस्त झालेल्या द्राक्ष बागेची आ.समाधान आवताडे यांनी प्रशासनास सोबत घेत बांधावर जाऊन केली पाहणी



पंढरपूर/प्रतिनिधीः गेल्या दोन दिवसापासून पंढरपूर शहर व तालुक्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या द्राक्ष बागा, लिंबू व इतर बागांचे मोठे नुकसान झाले असून नुकसानग्रस्त बागांची पाहणी विविध शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आज आमदार समाधान दादा आवताडे यांनी तहसीलदार सुशील बेल्हेकर यांच्यासह प्रशासनाचे अधिकारी कर्मचारी यांना सोबत घेत पाहणी केली.गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने द्राक्ष बाग शेतकऱ्यांसमोर अस्मानी संकट उभे राहिले आहे. द्राक्ष बागेवर फवारणी व इतर मोठा खर्च झाला असताना अवकाळी पावसामुळे हाताला आलेली द्राक्ष बाग गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यांच्या या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाने सरसकट करावे अशा सूचना प्रशासकीय अधिकाऱ्यांना आमदार समाधान दादा आवताडे यांनी दिल्या. शेतकऱ्यांचे नुकसान न भरून निघणारे असले तरीही पूर्वी अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना हेक्टरी १८ हजार रुपये मिळत होते. परंतु आता तेच हेक्टरी २२ हजार रुपये नुकसानग्रस्त म्हणून शेतकऱ्यांना मिळणार आहे. यामुळे एक वेळेचा फवारणी खर्चाचा लाभ तरी शेतकऱ्यांना मिळणार आहे. येत्या

अधिवेशनामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळवून देता येईल यासाठी आपण आवाज उठवू असेही आमदार समाधान दादा आवताडे यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यातील अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या बागांची पाहणी करुन नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून सादर करण्याच्या सूचना आ. आवताडे यांनी दिल्या.यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विजयसिंह दादा देशमुख,तुकाराम आबा कूरे, ग्रा.प.स.वैभव लिंगे,भास्कर घायाळ,लक्ष्मण जाधव,अनिकेत देशमुख,हनुमंत ताटे,मारुती काळे मेंबर,सज्जन जाधव,दत्ता आबा रोंगे पाटील,प्रसाद भैया कळसे,दत्ता यादव अध्यक्ष,दत्तात्रय काळे महाराज,सुनील रणदिवे,अमीन भाई शेख,पांडुरंग करकमकर, महेश चव्हाण,धनाजी गावंदरे,नौशाद भाई शेख ,अंकुश डांगे,भागवत वाघमारे, जालिंदर गुंड,दीपक देशमुख, सोमनाथ गंगथडे,मारुती पिलवे व शेतकरी तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

# लातूर व धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त गावांच्या विविध समस्यांबाबत विधान परिषद उपसभापती गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक




मुंबई : लातूर व धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त गावांच्या विविध समस्यांबाबत बुधवार दि.२९ रोजी विधान परिषद उपसभापती निल्हम (ताई) गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित राहून भूकंप पुनर्वसनासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्या शेतकऱ्यांना वाणिज्य वापरासाठी २५०० चौ.फुट आकाराचा भूखंड वाटप करण्यात यावा व त्यांना कबाला वाटप करावा तसेच कबाला वाटप करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीना देण्यात यावे, भूकंप पुनर्वसनासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत त्या शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राचे शिबीर घेऊन वाटप करण्यात यावे, भूकंपग्रस्त पुनर्वसित भागात मुलभूत सोयी सुविधा पुरविणे साठी विशेष किमान १००० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात यावी, दि.१८ डिसेंबर २०१५ चा शासन निर्णय रद्द करून धाराशिव-लातूर जिल्ह्यातील भूकंपग्रस्त कुटुंबीयांवरील अन्याय दूर करावा, १९९४ ते आजतागायतचा भूकंपग्रस्त आरक्षणाचा अनुशेष जाहीर करून तो त्वरित भरावा, भूकंपात महिलांच्या नावे वाटप केलेली घरे महिलांच्या नावे नियमित करावीत, शिल्लक असलेले भूकंपग्रस्त प्रमाणपत्र गाव पातळीवर शिबीर घेत वाटप करावे, उमरगा-लोहारा तालुक्यातील भूकंपग्रस्त गावातील मालकी हक्क प्रमाणपत्र आणि इतर अधिकार तहसीलदार यांना वर्ग करणे, भुकंपग्रस्त भागातील वरिष्ठ महाविद्यालयांना खास बाब म्हणुन १००% वेतन अनुदान मिळणे, भुकंपग्रस्त व सीमावर्ती भागातील शाळेंच्या वर्गातील किमान वर्ग विद्यार्थी संख्या अट शिथिल करणे, पवित्र पोर्टल २०२२ शिक्षक भरतीमध्ये भुकंपग्रस्तांच्या मागण्यांची पुर्तता करणे, नियमानुसार भरतीजागेच्या उपलब्ध जागांमध्ये २% जागा मिळणे व D.ED, B.ED अभियोग्यता धारकांचा अनुशेष भरून काढणे, सबंधित प्रवर्गातील भुकंपग्रस्त रिक्त जागेवर त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास त्या रिक्त जागी गुणवत्तेनुसार इतर प्रवर्गातील भुकंपग्रस्त पात्र उमेदवारास संधी देण्यात यावी, बेकायदेशीर (दत्तक) भुकंपग्रस्त प्रमाणपत्र धारक उमेदवारास आळा घालणे व मुळ भुकंपग्रस्त लाभार्थ्याला संधी देण्यात यावी, पेसा कायद्याप्रमाणे भुकंपग्रस्त आरक्षित जागांवर भुकंपग्रस्त मुळ लाभार्थ्यांनाच संधी देण्यात यावी, भूकंपग्रस्त भागातील युवकांना रोजगार निर्मिती करण्यासाठी भूकंपग्रस्त भागातील औद्योगिक क्षेत्रांचा विकास करणे(त्यामध्ये भूकंपग्रस्त उद्योजकांसाठी ०५ टक्के जागा आरक्षित करावे, भूकंपग्रस्त गावांतील वाढीव कुटुंबियांना गावातील संपादित शिल्लक क्षेत्रावर घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, १८ डिसेंबर २०१५ चा शासन निर्णय रद्द करून लातूर व धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त कुटुंबीयांवरील अन्याय दुर करावा आदी मागण्या / समस्या उपस्थित केल्या.

सदर बैठकीस औसाचे आमदार अभिमन्यूजी पवार, लातूर जिल्हाधिकारी श्रीमती.वर्षा ठाकूर, शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, उपविभागीय अधिकारी उमरगा गणेश पवार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे त्वरित वैद्यकीय अधीक्षक नियुक्ती करा : चंद्रशेखर मंडीखांबे

**वैद्यकीय अधीक्षक नसल्याने विविध दाखल्यासाठी गरीब लोकांना विनाकारण हेलपाटे**



सोलापूर/प्रतिनिधीः गेल्या दोन वर्षापासून अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे, वैद्यकीय अधीक्षक पदाची नियुक्ती करण्यात आलेली नाही, अक्कलकोट तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवर वसलेला गाव कायमचा दुष्काळी परिस्थितीत असतो तालुक्यातील गोरगरीब जनता मोठमोठे दवाखाना खर्च त्यांना परवडत नाही त्यामुळे ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे उपचारासाठी येत असतात परंतु जबाबदार म्हणून वैद्यकीय अधीक्षक या ठिकाणी नाही याबाबतचा सिव्हील सर्जन यांना अक्कलकोट विधान सभा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दि. १७/ २ / २०२२ पत्र दिले आहेत तसेच उपसंचालक आरोग्य सेवा उपसंचालक आरोग्य मंडळ पुणे श्री संजोग कदम यांचाही पत्र ११/ १०/२०२२ आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडील पत्र १९/ ९/२०२२ व वंचित बहुजन आघाडी जिल्हा अध्यक्ष यांचा पत्र ८/१२/ २०२२ इतके पत्र सिव्हील सर्जन देऊन सुद्धा वर्ष दीड वर्ष होत आले अजूनही वैद्यकीय अधीक्षक पदाची नियुक्ती झालेली नाही त्यामुळे अक्कलकोट स्वामी भक्तांना होणारा त्रास किंवा एखादा आजार निवारण करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे डॉक्टर उपलब्ध नसतात या सगळ्या गोष्टीचा विचार करून लवकरात लवकर वैद्यकीय अधीक्षक पदाची नियुक्ती करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा शल्य चिकीस्तक कार्यालयासमोर अमरण उपोषण सुरू करु असा इशारा यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला.. तत्पूर्वी जिल्हा शल चिकिस्तक सुहास माने यांचा सत्कार तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मंडीखांबे, जिल्हा उपाध्यक्ष शिलामनी बनसोडे, युवक शहराध्यक्ष, संदीप बाळशंकर, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे , सम्यक विद्यार्थी आंदोलनचे अध्यक्ष रवी पोटे, महासचिव नितिन शिवशरण, कांटेहळी शाखा महसचीव यशपाल शिंदे आदि पदाधिकारी उपस्थित होते,

# अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान शेतकरी हवालदिल



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यात बिजाच्या कडकडे वादळी वाऱ्यासह मोठा पाऊस, पंढरपूर तालुक्यातील कासेगाव सिद्धेवाडी अनवली तन्हाळी तावशी खर्डी गोपाळपूर सरकोली एकलासपूर नेपाल गाव ग्रामीण भागातील दिवसभर उन्हाचा तडाका बसत असताना सायंकाळी साडेबारा सुमारास विजांच्या कडकडे सोबत पावसाचा दमदार आणि मोठा पाऊस होत गेला दोन दिवसापासून पंढरपूर ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकरी राजा हवालदिल झाला आहे

गेल्या दोन दिवसापासून तापमानामध्ये वाढ चढ-उतार होत असलेले क्षेत्र दिसत आहे या बदलाचा वातावरणाचा फटका द्राक्ष डाळिंब वर भाजीपाल्यासह अनेक पिकांना मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शेतकऱ्याचे हातात तोंडाच्या पिके जमीन दोस्त झाले असल्यामुळे महाराष्ट्र राज्य शासनाने पडलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकाचे तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी अशी मागणी सर्वसामान्य शेतकरी वर्गातून मोठ्या प्रमाणात होत आहे

# २२ किलोमीटर पायी चालून मराठा आरक्षणासाठी विठुरायाला साकडे

## रोपळे येथील मराठा आंदोलकांनी आरक्षणासाठी पायी दिंडी



पंढरपूर/प्रतिनिधीः मराठा आरक्षणाच्या बाबतीमध्ये सध्या सुरू असलेल्या राजकारणाला तिलांजली देऊन सरकारने तातडीने मराठा आरक्षण द्यावे तसेच त्यासाठी या सरकारला सरकारमध्ये सकारात्मक भूमिकेसाठी देऊ अशा प्रकारचे साकडे पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील सकल मराठा समाजातील आंदोलकांनी २२ किलोमीटर अंतर पायी चालून मराठा आरक्षण दिंडीची माध्यमातून पंढरीच्या विठुराया चरणी घातले गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजता रोपळे येथून या मराठा आरक्षण दिंडीचे प्रस्थान झाले व पंढरपूर कुर्डूवाडी

या मार्गावर निघालेल्या या मराठा आरक्षण दिंडीला भेट देऊन पाठिंबाही दर्शवला बाबळगाव येथे येथील सकार मराठा समाजाच्या वतीने या आरक्षण दिंडीचे स्वागत केले यावेळी उपस्थित नागरिकांनी जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत शांतता व शिस्तीच्या आंदोलनावरती ठाम राहण्याची भूमिका व्यक्त केली

त्यानंतर आडीव येथे या आरक्षण दिंडीचे स्वागत करण्यात येऊन मराठा आरक्षणासाठी संबंध मराठा समाज एकवटला असून मराठा आंदोलकांनी मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार हा लढा पुढे सुरूच राहील अशी भूमिका येथील ह भ प शंकर महाराज चव्हाण सोमनाथ गोरे सर संचालक दिनकर चव्हाण समाज बांधवांनी व्यक्त केली मराठा आरक्षण दिंडी पंढरपूर शहरामध्ये दाखल होतात या दिंडीने चंद्रभागा नदीमध्ये जाऊन मराठा आरक्षण विरोधी भूमिकेचे शुद्धीकरण व्हावे असे साकडे घातले चंद्रभागा वाळवंटामध्ये दिंडीतील आंदोलकांकडून श्री पुंडलिक मंदिरामध्ये दर्शन घेऊन आरक्षण दिंडीने विठ्ठल मंदिराकडे प्रस्थान केली

आरक्षण दिले महाद्वार काठावर पोचल्यापासून नामदेव पायरी पर्यंत मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली त्यामुळे विठ्ठल मंदिर परिसरात या घोषणेची दणाणून गेला होता या आंदोलकांनी नामदेव पायरीचे दर्शन घेऊन विठ्ठलाला या सरकारला मराठा आरक्षणाची सदबुद्धी दे असे साखरे घालण्यात आले यावेळी मंदिर परिसरात उपस्थित यामध्ये सहभागी नोंदविता तर दिलाच परंतु घोषणाबाजी सहभागी कोण मोठ्या प्रमाणात घोषणा दिल्या

# पंढरपूर मंगळवेढा शेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी

## परिचारक यांची मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे मागणी



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर मागील दोन दिवसापासून झालेल्या अवकाळी पावसामुळे पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले असून झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी माझी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केले आहे याबाबत परिचारक यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले आहे

यामध्ये आधीच दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्यामुळे पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शेतकरी आपली पिके जगण्यासाठी संघर्ष करीत आहे मात्र गेले दोन दिवस सलग झालेल्या अवकाळी पावसामुळे पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे मंगळवेढा तालुक्यातील ज्वारी पूर्णपणे जमीन दोस्त झाली असून पंढरपूर तालुक्यातील फळबागेची आठवण आज नुकसान झाले आहे या अवकाळी पावसामुळे द्राक्ष डाळिंब मका ज्वारी यादी फळबागा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

अगोदर दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे पावसाअभावी खरीप हंगाम वाया गेला असून शेतकऱ्यांची सारी मदर रब्बी पिकावरच अवलंबून आहे पाऊस नसताना शेतकऱ्यांनी मेहनत करून जगवलेल्या पिकांची व अवकाळी पावसाने मोठे हानी झाले आहे त्यामुळे शेतकरी पुन्हा मोठ्या संकटात सापडला आहे

अनेक ठिकाणी शेतीतील उभी पिके जमीन दोस्त झाली असून द्राक्ष डाळिंब मका ज्वारी आली फळबागा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकाच्या नुकसानीने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत लवकरात लवकर मिळावी अशी मागणी मा.आ. प्रशांत परिचारक यांनी केली

# शरद पवारांनी अभिजीत पाटलांवर सोपवली मोठी जबाबदारी: रयत शिक्षण संस्थेच्या जनरल मंडळच्या सदस्यपदी निवड

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्यावर सोपवला रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीच्या सदस्य पदाचा पदभार अभिजीत पाटील यांचा पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात मोठा जनसंपर्क आहे शरद पवार हे सध्या रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आहेत मात्र यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एक संघ असताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार आणि खासदारांना शरद पवार यांनी रयत शिक्षण संस्थेवर काम करण्याची संधी दिली होती मात्र पक्षपोटीनंतर शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिलेल्या लोकांना या संस्थेवर काम करण्याची संधी आता देण्यात येत आहे. या अनुषंगाने अभिजीत पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीच्या सदस्य पदी निवड करण्यात आल्याने अमित पाटलांना नव्याने उदयास आलेले साखर सम्राट म्हणून ही ओळखली जाते. काही महिन्यापूर्वी अमित पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला होता त्यानंतर शरद पवारांनी थेट आमदारकीच्या तिकिटाचे स्पष्ट संकेत पाटलांना दिले होते अभी पाटलाने पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत अनेक मतदारांना धूळ चारून आपली सत्ता आणली विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत



विजय संपादन केल्यानंतर हवीच पाटील यांचे पंढरपूर मंगळवेढा तालुक्याचे राजकारणात अतिशय मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे

# देशातील प्रत्येक कलाकाराला खासदार सांस्कृतिक महोत्सवाची आतुरता : मुख्यमंत्री शिंदे

नागपूर : नागपूर येथील खासदार सांस्कृतिक महोत्सवाने देश-विदेशातील नामवंत कलाकार तसेच स्थानिक कलाकारांच्या कलाकृती नागपूरकर रसिकांना उपलब्ध करून दिल्या आहेत. ही येथील जनतेसाठी मोठी सांस्कृतिक मेजवानी ठरत आहे. खासदार महोत्सवाची कलाकारांप्रमाणेच जनताही आतुरतेने वाट बघत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे काढले.खासदार सांस्कृतिक महोत्सवाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भेट दिली. त्याप्रसंगी ते बोलत होते. महोत्सवाचे आयोजक तथा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ संपादक श्रीपाद अपराजित, खासदार कृपाल तुमाने, आमदार प्रवीण दटके, आशिष जायस्वाल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती मनोज सुर्यवंशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा आदी




उपस्थित होते. श्री नितीन गडकरी यांची ओळख विकास पुरुष म्हणून संपूर्ण देशात आहे. रस्ते, इमारती व पायाभूत सुविधांच्या निर्मितीसोबतच त्यांच्यातील कलासक्त पुरूष क्रीडा, संगीत, नृत्य आणि विविध कलांच्या माध्यमातून आपली कलासंस्कृती जोपासण्याचे काम करित असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाला शोभेल असे हे आयोजन असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले की खासदार सांस्कृतिक महोत्सवातून विदर्भातील स्थानिक कलाकारांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असल्याने व अन्य कलाकारांच्या कला बघण्याची संधी मिळत असल्याने त्यांच्यासाठी हा महत्वाचा महोत्सव आहे.नितीन गडकरी यांनी प्रास्ताविकातून सांस्कृतिक प्रगतीसाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले.यावेळी मान्यवरांनी 'द पियुष मिश्रा प्रोजेक्ट बल्लीमारान' या कार्यक्रमाचा आनंद घेतला. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पियुष मिश्रा व गीतरामायण नाटीका प्रमुख अरूणा भिडे यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाला रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.